संदर्भ क्र.: एमएमसीसी/११ वी व १२ वी MCVC शिष्यवृत्ती व फ्रीशिप/२०२४-२०२५/187 ०५/०९/२०२४

# नोटीस

## ११ वी व १२ वी MCVC च्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी स्कॉलरशिप व फ्रीशिप सन २०२४-२०२५ करीता ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरणे बाबत

११ वी व १२ वी MCVC सर्व पात्र मागासवर्गीय विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते कि, जे विद्यार्थी अनुसूचित जाती /अनुसूचित जमाती/व्हीजेएनटी/विमाप्र/इमाव संवर्गातील असून, शासकीय शिष्यवृत्ती अथवा फ्रीशिप साठी पात्र आहेत. अश्या विद्यार्थ्यांनी सन २०२४-२०२५ करीता FRESH तसेच RENEWAL चे अर्ज https://mahadbt.maharashtra.gov.in या वेबसाईटवर ऑनलाईन पद्धतीने भरावयाचा आहे. सर्व पात्र नव्याने अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांनी New Applicant Registration करून स्वतःचे UserID आणि Password तयार करावे व ज्या विद्यार्थांनी या पूर्वी वरील नमूद वेबसाईटवर अर्ज भरले आहेत अश्यानी त्यांचे या पूर्वीच्या userid नेच अर्ज भरावे. नवीन तयार केलेला UserID आणि Password हा कायमस्वरूपी लागणार असल्या कारणाने त्याची योग्य अशी नोंद करून ठेवावी. सदर अर्ज भरतेवेळी नमूद केलेले सर्व ओरिजनल कागपत्रे २५६ kb च्या आत jpeg स्वरूपात अपलोड करावे.

ऑनलाईन अर्ज भरत असताना Current Course मध्ये आपल्या कनिष्ठ महाविद्यालयाचे नाव **Marathwada Mitra Mandal's Junior Vocational Wing (2765211369)** असे निवडावे व प्रोफाइल १००% झाल्यावर संवर्ग व उत्पन्नावर आधारित स्कॉलरशिप अथवा फ्रीशिप लागू करावी. **व फी भरल्याबाबतच्या रकान्यात ०.०० (शून्य रुपये) असे नमुद करावे.**

RENEWAL करीत असताना Online दिलेल्या सूचना काटेकोरपणे वाचून त्याप्रमाणे Profile Update करावा, उदाहरणार्थ चालू शैक्षणिक वर्ष तसेच इतर आवश्यक ते बदल करूनच, अर्ज मागील (२०२०-२०२१) वर्षी लागू केलेल्या शिष्यवृत्तीस (Scholarship) अथवा फ्रीशिपसाठी (Freeship) पुनःश्च लागू करावा.

**शिष्यवृत्ती (Scholarship) साठी अनुसूचित जाती व अनुसूचित जमातीसाठी कौटुंबिक उत्पन्न मर्यादा रु. २,५०,०००/- पर्यंत आहे व व्हीजेएनटी/विमाप्र/इमाव करीता रु. १,५०,०००/- पर्यंत आहे.तसेच अनुसूचित जाती /अनुसूचित जमाती साठी फ्रीशिप (Freeship) साठी उत्पन्न मर्यादा नसून व्हीजेएनटी/विमाप्र/इमाव फ्रीशिप (Freeship) साठी ची कौटुंबिक उत्पन्न मर्यादा रु. ८,००,०००/- इतकी आहे.**

| अ.क्र. | कागदपत्रे |
|---|---|
| १. | १० वी, ११ वी उत्तीर्ण झालेली गुणपत्रिका (झेरॉक्स) |
| २. | मागील शैक्षणिक वर्ष २०२३-२०२४ ची उत्तीर्ण झालेली गुणपत्रिका (झेरॉक्स) |
| ३. | १० वी सोडल्याचा दाखला (झेरॉक्स) |
| ४. | विद्यार्थ्याच्या नावाचे डोमेसाइल सर्टिफिकेट (झेरॉक्स) |
| ५. | विद्यार्थ्याच्या नावाचा जातीचा दाखला (झेरॉक्स) |
| ६. | कौटूंबिक उत्पन्न आर्थिक वर्ष २०२३-२०२४ चा तहसीलदार चा दाखला ( उत्पन्न मर्यादा योजनेच्या नियमांनुसार)(Original) |
| ७. | आधारकार्ड (झेरॉक्स) |
| ८. | राशनकार्ड (झेरॉक्स) |
| ९. | विद्यार्थ्यांच्या बँक पासबुकचे पहिले पान (Original) |
| १०. | चालू शैक्षणिक वर्षाची फी भरल्याची पावती (झेरॉक्स) अथवा महाविद्यालयाचे बोनाफाईड सर्टिफिकेट |
| ११. | चालू वर्षा करीता पालकांचे अपत्यां बाबतचे स्वयंघोषित प्रमाणपत्र |

सर्व पात्र विद्यार्थ्यांनी स्वतःचा मोबाइल नंबर व बचत खाते हे त्वरित आधारकार्डशी संलग्नित करून घेणे आवश्यक आहे. तसे नसल्यास त्यांची शिष्यवृत्ती अथवा फ्रीशिप जमा न झाल्यास ते स्वतः जबाबदार राहतील. तसेच ऐकावेळेला एकच शिष्यवृत्तीचा लाभ विद्यार्थ्याला घेता येईल.

अचूक अर्ज भरून झाल्यावर वरील कागदपत्रांसोबत (नमूद केलेल्या क्रमानुसार)आवश्यक त्या सर्व कागदपत्रासोबत महाविद्यालयाच्या स्कॉलरशिप विभागात सोमवार ते शनिवार सकाळी ११.०० ते दुपारी १.०० या वेळेत जमा करावे.

MAHADBT पोर्टल वर ऑनलाईन अचूक अर्ज भरलेल्या अर्जाची प्रत व इतर वरील वरिल नमूद केल्या क्रमवारीनुसार कागदपत्रे सादर करण्याची **अंतिम तारीख ही दिनांक १५/०३/२०२५** असून, त्यानंतर प्राप्त झालेल्या अर्जांवर महाविद्यालयाकडून कुठल्याही प्रकारची कार्यवाही होणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

सर्व मागासवर्गीय पात्र विदयार्थ्यांना त्यांच्या अभ्यासक्रमानुसार लागू असल्याप्रमाणे स्कॉलरशिप अथवा फ्रीशिपचा अर्ज भरणे क्रमप्राप्त असून, तो न भरल्यास अथवा मंजूर न झालयास त्याची सर्वस्वी जबाबदारी विद्यार्थ्यांची राहील व महाविद्यालयाची शैक्षणिक फी व इतर उर्वरित फी भरणे विद्यार्थ्यास बंधनकारक राहील. व त्याबाबत कुठल्याही प्रकारची तक्रार स्वीकारली जाणार नाही.

M.M. COLLEGE OF COMMERCE PUNE-4

**श्रीमती. हर्षला वाडकर**
प्रशासन अधिकारी

**डॉ. देविदास गोल्हार**
प्राचार्य

प्रत: १. सर्व शाखा प्रमुखांना विद्यार्थ्यांना सूचित करण्यासाठी
सोबत: RENEWAL कारण्याबाबची कार्यपद्धती जोडली आहे.